## जमा

रु. आ. पै.

७८३-१२-०

५—०-० बाळा महाराज, खामगांव
२—४-० विनायक आप्पाजी वैद्य
१—४-० साईनाथ विनायक वैद्य
५—०-० श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील, अंधेरी.
२—०-० रघुनाथ त्र्यंबक गिरधर
१—४-० शंकर नाना पाटील
११—०-० बापूराव राघोजी बोरावके व्हा. प्रे. डि० लो. बोर्ड नगर
६३—०-० मोंगलाईतील लोकांकडून व दासगणू महाराजांकडून रेशमी उपरण्याच्या जोड्या आल्या त्या जमा
६७—७-० बाबासाहेब तर्खड यांचे मार्फत आलेली जमा.
  ५—०-० यशवंत जनार्दन गाळवणकर, वांद्रें.
  ४—४-० आनंदराव परशराम डोळस, कांदेवाडी
  १—०-० चिंतामण परशराम भिडे, पुणें
  २—०-० बाळकृष्ण माधवराव, मानकर वांद्रें
  २—०-० सोनाबाई जयकर

९४१-१५-०

## खर्च

रु. आ. पै

११७९-१०-६

५८—१-० सुंदरराव दिनानाथ नवलकर यांचें हस्तें खर्च झाला तो, कव्हर पत्रिका छपाई टपालखर्च
५९-१३-६ बाळा पिलाजी गुरव यांचे मार्फत भक्तमंडळीस रामनवमीचा प्रसाद रवाना झाला त्याबद्दल खर्च

१२९७-९-० एकंदर खर्च

बाराशें सत्त्याण्णव रुपये नऊ आणे शून्य पै एकंदर खर्च

१३—७-० श्रीशिल्लक श्रीरामनवमी उत्सवखात्यांत जमा

१३११-०-०

जमा

| | | |
|---|---|---|
| रु. आ. पै | | |
| ९४१-१५-० | | |
| | ३—०-० | मोरेश्वर नारायण सावे, मुंबई |
| | ५—०-० | केशव गणेश आजरेकर, बेळगांव |
| | १०—०-० | दाजी विठ्ठल-सांबारे, पार्ले |
| | १०—०-० | डॉ. केसरीनाथ वासुदेव सावे, मुंबई |
| | १—०-० | ना. वा. राणें, उंबरगांव |
| | ६—१०-० | श्रीराम नीळकंठ चौबळ, खार |
| | १—०-० | घनश्याम शिवराम पोतदार, शीव |
| | १—४-० | छगनलाल कृष्णराव मुकुंटे, मुंबई |
| | १—४-० | प्रभाकर नारायण पाटणकर |
| | १—४-० | दत्तात्रेय नारायण पाटणकर, वांद्रें |
| | २—०-० | गंगाधर नारायण चौबळ, वांद्रे |
| ९४१-१५-० | | |

जमा

रु. आ. पै

९४१-१५-०

५—०-० आत्माराम लाडोबा आरोळकर, गुंटकलरू

०—५-० अर्जुन बाळा, केळवे

१—०-० बाळाराम विश्वेश्वर आचार्य, केळवे.

२—०-० वासुदेव सीताराम सामंत, धुरीवाड

१—४-० सदानंद भास्कर कुडाळकर, वांद्रें

१—४-० पांडुरंग शिवराम कोळवे, गांवदेवी.

६७-७-०

५३-१३-३ सुंदरराव दिनानाथ नवलकर यांचे मार्फत रक्कम आली ती जमा.

०—४-० गणेश शिवराम कारखानीस, वांद्रें

०—४-० गोविंद शिवराम कारखानीस, वांद्रें

१—४-० चिंतामण रामनाथ सांतघरे

९९५-१२-३

जमा

रु. आ. पै

९९५-१२-३

१—४-० सूर्यकांत राम-
नाथ सातघरे

२—०-० मधुसूदन
धोंडूजी कांबळी,
मुंबई

११-०-० शामराव भास्कर
कंटक, मुंबई

१—४-० सुंदरराव दिना-
नाथ नवलकर,
मुंबई

१—४-० सौ. शांताबाई
सुंदरराव नवल-
कर, मुंबई

१—०-० गोवर्धन माधव-
राव विजयकर,
मुंबई

०—४-३ दत्तात्रेय महा-
देव कुळकर्णी,
मालाड

१—०-० सरस्वतीबाई,
मुंबई

१—०-० गंगाबाई माध-
वराव विजय-
कर, मुंबई

२—०-० विष्णु बळवंत
पितळे, पार्ले

१—०-० के. आर.
आंजर्लेकर,
मुंबई

९९५-१२-३

जमा

| रु. आ. पै | | |
|---|---|---|
| ९९५-१२-३ | | |
| | १—४—० | के. ए. पत्की, सांताक्रूझ |
| | १—०—० | गोविंद श्रीधर खारकर, ठाणे |
| | १—०—० | श्रीधर नारायण खारकर |
| | १—०—० | वासुदेव पुतळाजी, ठाणें |
| | ५—०—० | श्रीकृष्ण गोविंद दिघे |
| | २—०—० | सीताराम विश्वनाथ तोडेकर |
| | ७—५—० | नारायण पांडुरंग गुरुजी, बडोदें |
| | २—०—० | के. ए. बेंद्रे, कर्जत |
| | ५—०—० | सौ. सुंदराबाई पाटणकर |
| | ३—०—० | जनार्दन रामचंद्र दळवी, वसई |
| | ४—१४—० | महादेव गंगाधर कोरान्ने, दिल्लीमोरा |
| | २—०—० | मिसेस सोराबाई ईरेशा ड्रायव्हर, मुंबई |
| ९९५-१२-३ | | |

जमा

रु. आ. पै

२—०-० जहांगीर रुस्तुमजी दलाल
१—०-० रामकृष्ण नाना वगळ

---

५३-१३-०

५२-१२-० सुंदरराव दिनानाथ नवलकर यांचे मार्फत आले ते जमा.

१—०-० सीताबाई रामकृष्ण वगाळ, मुंबई
१—०-० खंडेराव दिनानाथ वखारकर, मुंबई
७—०-० पिरूबाई रामराव कोठारे, मुंबई
१—४-० दत्तात्रय आनंदराव पितळे, मुंबई
३—०-० सरदार एम्. सी. मुदलीयर, पुणें
१—०-० एम्. जी. `घे, इन्दोर
१—०-० उमाबाई गंगाधर सामंत, भायंदर
५—०-० दत्तात्रेय विठ्ठल पाटणकर कल्याण
१-१०-० शांताराम बळवंत नाचणे, कुर्ला
१-१०-० पांडुरंग विठ्ठल
१—४-० गंगाधर मोरेश्वर सुगवेकर

---

१०४८-८-३

## जमा

रु. आ. पै

१०४८–८–३

१–४–० सावळाराम आत्माराम शिरोडकर

१–०–० वासुदेव सावळाराम शिरोडकर

०–४–० दत्तात्रेय सखाराम दीक्षित, वांद्रें

०–४–० आर्. डी. मथुरे

१–०–० आनंदराव गणपतराव तळपदे, वांद्रें

१–०–० बाबाजी आनंदराव मोहिते, पालघर

१–०–० रघुनाथ दत्ताराम रेगे, कुडाळ

५–०–० आनंदराव मधुसूदन पौंडवळ, मुंबई

२–०–० कु. मालितीबाई आर. चोणकर, मुंबई

२–८–० रामचंद्र श्रीपाद कुर्तडकर, दादर

१–४–० बाळकृष्ण केरोबा नाईक, मुंबई

१–४–० चंपूबाई आनंदराव धराधर

२–०–० कु० शांताबाई ब्रह्मांडकर.

१–४–० वेणूबाई अजिंक्य

५–०–० गोविंदराव हरिश्चंद जोशी

१०४८–८–३

जमा

रु. आ. पै

१०४८–८–३

२—०—० गणपतलाल हिंमत लाल भट

५७–८–० सुंदरराव दिनानाथ नवलकर हस्तें.

२–०–० पुंजाबाई मोहनलाल शहा, मुंबई

२–०–० के. वाय्. प्रधान, विरमगांव

०–८–० दुर्गाबाई काकतकर

०–४–० अहिल्याबाई कुळकर्णी

०–४–० भागीरथीबाई नवाथे, पुणें

०—४–० विनायक दाजी भावे

१—०–० मधुसूदन विनायक भावे

१—०–० मथुराबाई गोळे, जळगांव

१—०–० काशीराम भागूजी परीट, ठाणें

१—०–० महादेव विष्णु चौबळ

१—०–० विश्वनाथ नारायण खारकर

१—४–० गणपतराव मोरेश्वर कोठारे, मुंबई

१—४–० अनंत मंगेश पाटकर

१—४–० शांताराम महादेव हळखणेकर

११०६–०–३

## जमा

रु. आ. पै

११०६—०—३

१—०—० हरि कृष्ण करंदीकर, बेलापूर

२—०—० सौ. सरस्वतीबाई कोठारे, ग्वाल्हेर

१—४—० दत्तात्रेय राजाराम राणे

१०—०—० रामचंद्र बळवंत भाटे

२—०—० लक्ष्मीबाई चोळकर

५—०—० सौ. खाशीबाई ता० पुणें

५—४—० जी.एन्. दाभोळकर

१—४—० जी. व्ही. मोडक, कल्याण

१—४—० एच्. टी. गोडबोले, कल्याण

१—४—० आर. के. राव

२—०—० सौ. सुशीलाबाई प्रधान, व्यास

५—०—० एस्. जी. नाडकर

५—४—० भाऊ आप्पाजी वैद्य

१—०—० ना. व. टिपणीस, खामगांव.

४५—०—० सुंदरराव दिनानाथ नवलकर यांचे मार्फत आली ती जमा

२—०—० परुषोत्तम गोपाळ घडयाळजी, मुंबई

१—०—० त्रिवेणीबाई कन्हैया

११५१—०—३

जमा

रु. आ. पै.

११५१–०–३

१–४–० कु. सोनाबाई शामराव धुरंधर

०–८–० सरस्वतीबाई आय्. सी. गणपती

२–०–० लक्ष्मीबाई गोरक्षकर, सांताक्रुझ.

१–४–० ताराबाई ना० गोरक्षकर, सांताक्रूझ

१–४–० वसंतराव नारायण गोरक्षकर, सांताक्रूझ

१–४–० सुशीलाबाई वसंतराव गोरक्षकर, सांताक्रूझ

१–४–० सीमंतिनी (डॉली)

१–४–० सदाशिव

१–४–० रामराव दिनानाथ मदन

१–४–० नादीरशहा मेहेरवानजी, दादर

१–४–० दोराबजी ताडीवाला, मुंबई

५–०–० माणकशहा लिमजीभाई, मुंबई

५–०–० गजानन त्र्यंबक कर्णिक, कल्याण

१–०–० मनोरमाबाई वैद्य

१–०–० शांताबाई राजे

१–०–० द्वारकाबाई वासुदेव तळपदे

११५१–०–३

जमा

रु. आ. पै

११५१—०—३

१—४—० यशवंतराव विठोबा देसाई

५—०—० गोविंद विनायक वाड, भुसावळ

२—०—० सौ. जानकीबाई गोविंदराव वाड

१—०—० श्रीपाद गंगाधर गायधने

१—४—० विश्वनाथ कृष्णाजी भीसके

१—४—० ना. रा. खेडकर, ग्वाल्हेर

१—०—० व्ही. के. संत, जिरापूर

१—४—० कु. साईप्रभा मोरेश्वर प्रधान

१—४—० साईप्रसाद मोरेश्वर प्रधान

४५—०—०

७—४—० सुंदरराव दिनानाथ नवलकर यांचे हस्तें

१—४—० कु. साईचिंतामणि मोरेश्वर प्रधान

१—४—० अमीन गजानन कोठारे

१—४—० नबीबाई गजानन कोठारे

११५८—४—३

जमा

रु. आ. पै

११५८-४-३

१—०-० सुधीर विनायक कीर्तिकर

१—४-० आनंदराव भास्कर गडकरी, गोवा

१—४-० विनायक बाबाजी मानकर, मुंबई

७—४-०

८२—२-० श्रीसाईबाबांच्या पेटींत निघाले ते जमा

एकंदर जमा

रु. आ. पै.

१२४०-६-३ एकंदर जमा

८७४-८-० दासगणू मार्फत

२१६-५-३ सुंदरराव नवलकर यांचे मार्फत

१३८-०-९ बाबासाहेब तर्खड यांचे मार्फत

८२-२-० बाबांची पेटी

१३११-०-०

तेराशें अकरा रुपये शून्य आणे शून्य पै.

एकंदर जमा.

**चुकीची दुरुस्तीः** वरील श्रीरामनवमीच्या वृत्तांतांत पान १६ वर कमी पडलेली रकम रु. ८७-२-९ भरली असें नसून शिल्लक श्रीरामनवमी उत्सवखात्यांत रु. १३-७-० जमा केले. जमा रु. १२१०-६-३ न होतां जमा रु. १३११-०-० जमा झाले, असें वाचावें.

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादक महाशय यांस सप्रेम कृतानेक शि. सा. न. वि. वि. खालील मजकुरास आपल्या श्रीसाईलीला मासिकांत कृपेनें प्रसिद्धि द्यावी अशी सविनय विज्ञप्ति आहे.

# आमचा श्री गिरिनार

## अथवा

# श्री गिरिनारायण क्षेत्रप्रवास

श्रीसाईदत्त परमात्मा आपल्या विशद, विमल, विशुद्ध हृदयांत निरंतर वास करीत असतांना, तो निस्सीम, नितांत, निर्मल प्रेमानें वश होत असतांना, तो सुलभ, सुगम, सुखद, कर्मप्रधान भक्तिमार्गानें भेटत असतांना व निर्व्याज, निष्कलंक व निःशंक श्रद्धायुक्त आचरणानें प्राप्त होत असतांना, तो कठीण, भयंकर, कष्टप्रद ठिकाणीं राहतो, क्लेश, दुःख, तापजनक साधनांनीं वश होतो, प्रचंड, भीषण, अत्युग्र हठयोगादि ज्ञानमार्गांनीं भेटतो, व कठोर, दारुण, परुषतम, लोहपिष्टाशनादि उपायांनीं साध्य होतो, अशा भोळ्याभाबड्या श्रद्धेनें व भावनेनें प्रेरित होऊन असंख्य भक्तजन, स्फटिकप्रभ बर्फाच्छादित निर्जन, निबिड कांतारविभूषित हिमाचलादि गिरिराजांच्या उच्चतम शिखरस्थित श्री बदरिकेदार, श्री बद्रीनारायण, श्री पशुपतीश्वर, श्री मल्लिकार्जुनादि विश्ववंद्य देवांच्या यात्रेस जातात. या भावनेस व श्रद्धेस आम्ही तरी अपवाद कोठून असणार ! श्री गिरनार हें वरील स्थानाप्रमाणेंच जाण्यास दुःखतर व दुर्गम आहे.

नटश्रेष्ठ श्रीसाईदत्तप्रभु अखिल विश्वांत निरनिराळ्या दिव्य स्थानीं निरनिराळ्या पवित्र स्वरूपांत नटले आहेत. गिरनारवर श्री. साई परमात्मा, श्री. गुरुदत्तात्रेय या पुण्य व पूज्य नांवानें वास्तव्य करितात, व ज्या

ठिकाणीं कोटी भक्तजन अहोरात्र लोटांगण घालतात, त्या श्री साईदत्तगुरु-चरणीं आपणही एकवार लोटांगण घालावें अशा त्यांच्याच उद्दीपित प्रेरणेनें आम्हीं गिरनारला जाण्याचा निश्चय केला.

आम्ही ता. २७–२–३५ रोजीं रात्रीं मुंबई-बडोदा रेल्वेचें स्टेशन मुंबई सेंट्रलहून ९–३० वाजतां काठियावाड एक्स्प्रेस गाडीनें निघालों. मी, माझें कुटुंब सौ. जानकीबाई, वडील भगिनी आऊताई, व मथुताई, कल्याणचे डॉक्टर हरि पांडुरंग ऊर्फ भाऊसाहेब ढवळे, त्यांचें कुटुंब सौ. इंदिराबाई, धाकटे चिरंजीव दत्तात्रय, त्यांच्या कनिष्ठ भगिनी सौ. मैनाताई व त्यांचे धाकटे चिरंजीव श्रीनिवास अशी आम्ही एकंदर लहानमोठी ९ मंडळी होतों. आम्ही दुसऱ्या दिवशीं ता. २८–२–३५ रोजीं सकाळीं ९ वाजतां विरमगांव स्टेशनवर उतरलों. येथें गाडी बदलावी लागते. येथून पुढें छोटी रेल्वे लागते. आम्ही ज्या प्लॅटफॉर्मावर उतरलों, त्याच प्लॅटफॉर्मवर दुसऱ्या बाजूला समोरच ही छोटी गाडी उभी असते. ती अर्ध्या तासानें म्हणजे ९–३० वाजतां लागलीच निघते. येथें स्टेशनवर व छोटया गाडींत जेवणाची व फराळाची सोय असते.

आम्ही नंतर छोटया गाडींत बसून दुपारीं ४ वाजतां राजकोटला पोहोंचलों. राजकोटला तीन स्टेशनें आहेत. राजकोट, सिटी राजकोट जंक्शन व राजकोट टाउन. आम्हास रावसाहेब नरहर रामचंद्र ऊर्फ डॉक्टर घाटे असिस्टंट सर्जन, सिव्हिल हॉस्पिटल राजकोट, यांच्या घरीं उतरावयाचें होतें व त्यांचें घर राजकोट जंक्शनपासून अवघें ४–५ मिनिटांच्या रस्त्यावर असल्यामुळें आम्ही राजकोट जंक्शन स्टेशनवर उतरलों.

रावसाहेब घाटे हे माझ्या कुटुंबाचे सख्खे मावसबंधु. स्टेशनवर तांगे व बैलगाडया मिळतात. चार आण्यांपासून लांबीच्या मानाप्रमाणें भाडें घेतात. सामानाकरितां मजूरही मिळतात.

आम्हाला मुंबई सेंट्रलपासून राजकोटपर्यंत प्रत्येकीं रेल्वेभाडें ८ रुपये १५ आणे पडलें.

शिवरात्रीला गिरिनारायणाच्या दर्शनाचें अत्यंत पुण्य आहे असें आम्हास पूर्वीच कळलें असल्यामुळें आम्हीं त्या बेतानेंच राजकोटला गेलों व माझी मुलगी चि. जानकीबाई जटार, एल्. सी. पी. एस्., लेडी डाक्टॅर चि. सौ. कमलाबाई व कुमारी चि. मीनाक्षी अशी मंडळी, श्री. आण्णासाहेब माणके गार्डन सुपरिंटेंडंट, त्यांचें कुटुंब, जामनगर जेलर साहेबांचें कुटुंब व त्यांची कन्या, यांसह त्याच दिवशीं म्हणजे ता. २८ रोजीं सायंकाळीं त्याच यात्रेकरितां राजकोटास पूर्वसंकेतानुरूम रावसाहेब घाटे यांच्या घरीं आली. रात्रीच्या १२ च्या गाडीनें निघून सकाळीं जुनागडास जावयाचें व ता. २-३-३५ रोजीं शिवरात्रीच्या दिवशीं पहाटे गिरनार चढावयास लागावयाचें असें ठरलें होतें.

परंतु मनुष्य विचार करतो एक व देव घडवितो दुसरेंच, अशी जी आपल्यांत म्हण आहे तसेंच झालें. ता. २८ रोजीं सकाळींच गाडींत डॉक्टॅर ढवळे यांचें कुटुंब अस्पर्श झालें. त्यामुळें आम्हास रावसाहेब घाटे यांच्या घरीं त्यांचा यथेच्छ पाहुणचार ४ दिवस घेणें भाग पडलें. माझे सूनबाईची विटाळसेपणाची अगदीं घटका घातली असल्यामुळें तिला चार दिवस आमचेबरोबर थांबतां येईना. आमच्या लेडी डॉक्टरांची रजा ४च दिवसांची असल्यामुळें त्यांनाही आमच्याबरोबर येण्याचें मनांत असून थांबतां येईना. या अडचणींतून सुटण्याकरितां आमच्या लेडी डॉक्टर, सूनबाई, अण्णासाहेब माणके व त्यांचें कुटुंब व जेलरसाहेबांची मंडळी ही ठरल्याप्रमाणें त्याच रात्रीं १२ च्या गाडीनें राजकोटहून जुनागडाला गेली. त्यांनीं शिवरात्रीच्या दिवशीं गिरिनारायणाचें दर्शन घेऊन सायंकाळीं परत जुनागडला येऊन दुसऱ्या दिवशीं त्यांच्यापैकीं आमचे लेडी डॉक्टर व सूनबाई एवढ्याच राज-कोटला दुपारीं येऊन सायंकाळीं जामनगरास गेल्या. ही सर्व मंडळी १॥ वर्षांच्या मीनाक्षीला कडेवर घेऊन पायांनींच वर चढली व पायींच खालीं उतरली. माझी मुलगी व सूनबाई ह्या घाईघाईनें दर्शनाला गेल्या असल्यामुळें व जातां-येतां शिवरात्रीच्या यात्रेच्या विलक्षण गर्दीमुळें त्यांच्या मार्गाच्या

कठिणतरतेकडे किंवा सुलभतेकडे जितकें लक्ष जावें तितकें गेलें नाहीं. त्यांच्या सांगण्याप्रमाणें व प्रत्यक्ष अनुभवाप्रमाणें रस्ता फार अवघड नाहीं. शेवटपर्यंत पायऱ्या आहेत व वर जाऊन दर्शन घेण्यास हरकत नाहीं असें दिसलें. परंतु या माहितीनें आमचें कोणाचेंच समाधान झालें नाहीं. वर चढण्यास पायऱ्या आहेत खऱ्या; पण अगदीं शेवटीं श्रीगुरु दत्तात्रेयांच्या टेकडीस पायऱ्या नाहींत. तो निमुळत्या सुळक्याचा एक अति उंच कडा आहे व त्या कडयालाच पाऊल राहण्याइतक्याच खोबळ्या किंवा अंगच्या अतिअरुंद खोलगट पायऱ्या केलेल्या आहेत व या पायऱ्यांच्या एका बाजूला कडा व दुसऱ्या बाजूला ( भिंत वगैरे नसून ) चारपांच हजार फूट खोल जमीन अशी आहे. पातळ व किडकिडीत मनुष्य असेल, तरच तो या पायऱ्या चढून वर जातो. पण वात किंवा मेदबद्ध शरीराच्या मनुष्याला ह्या पायऱ्या मुळींच चढतां येत नाहींत. ते खालूनच दर्शन करितात. वर गेल्यावर जागाही अत्यकुंचित असल्यामुळें डोळे फिरतात. अशा प्रकारची माहिती आम्हास पूर्वी मिळाली असल्यामुळें व त्यामुळें आमच्या मनावर त्या स्थानाच्या भयंकरपणाचा जो परिणाम झाला होता, त्यांत कांहीं फरक झाला नाहीं.

रावसाहेब घाटे यांचीं मुलें ५।६ वर्षांपूर्वीं तेथें जाऊन आलीं. आपले शिरडीकर श्री. माधवराव देशपांडे हेही कांहीं वर्षांमागें त्या ठिकाणचें दर्शन घेऊन आले. पण या मंडळीच्या मुखांतून त्या स्थलाचीं जीं वर्णनें ऐकिलीं, त्यापासून आमचा पूर्वग्रहच दुणावत चालला. तथापि आमची मुलगी व सूनबाई कालच जाऊन आल्या, त्या अर्थी आपल्यासही जाण्यास अडचण पडणार नाहीं असें मात्र मला वाटूं लागलें.

असो. आम्ही ता. ४ मार्च रोजीं राजकोटाहून सकाळीं ९ वाजतां राजकोट वेरावळ गाडीनें निघून दुपारीं ४ वाजतां जुनागड स्टेशनवर उतरलों. आम्ही तिकडच्या प्रदेशासंबंधीं अजाण असल्यामुळें श्री. विश्वनाथ गणेश ऊर्फ आण्णासाहेब माणके गार्डन सुपरिंटेंडंट आम्हाला शहरांत घेऊन

जाण्याकरितां जुनागड स्टेशनवर आले होते. आम्हास राजकोटहून जुना-गडपर्यंत प्रत्येकीं भाडें १–३–० पडलें. त्याचप्रमाणें टांग्यांतून गांवांत जाण्यास प्रत्येक टांग्याला ०–४–० प्रमाणें भाडें दिलें. या शहरांत पुष्कळ धर्मशाळा आहेत.

आण्णासाहेबांची मोटर होती. मी व आण्णासाहेब मोटरींत बसलों. बाकीची मंडळी टांग्यांत बसली. आम्ही सर्वजण जुनागड शहरांत बहाऊ-द्दीन कॉलेजमधील प्रोफेसर श्रीयुत रघुनाथ दत्तात्रय ऊर्फ जोशीसाहेब, एम. ए. यांच्या बिऱ्हाडीं गेलों. तेथें आमची निजण्याबसण्याची उत्तम सोय होती. श्री. बाबुराव परशराम ऊर्फ भाऊसाहेब पुराणिक, बी. ए.,एल्‌एल्‌. बी., कॅमिशनरसाहेबांचे शिरस्तेदार यांच्या बिऱ्हाडीं त्यांचें सदाचार व सत्शील-संपन्न कुटुंब सौ. शांताताई यांनीं आमची चहापाण्याची व जेवणाखाण्याची उत्कृष्ट सोय केली. याच परोपकारी त्रैमूर्तींनीं (बाबूराव=ब्रह्मा, रघुनाथराव=विष्णु, व विश्वनाथराव=महेश) आमची दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ५ मार्च रोजीं उजाडण्यापूर्वी श्री गिरनार पायथ्यापर्यंत जाण्यास लागणाऱ्या टांग्याची व नंतर पर्वतारोहण व अवरोहण करण्याकरितां लागणाऱ्या डोल्यांची रात्रीच्या रात्रीं शहरांत जाऊन आगाऊ तजवीज करून ठेविली.

आमचे लेडी डॉक्टर व सूनबाई यांच्यापेक्षां आण्णासाहेब माणके व त्यांची मंडळी आम्हाला गिरनार टेकडीसंबंधीं विशेष ज्ञान करून देतील अशा उत्कटेच्छेनें व आतुरतेनें आम्ही जोशीसाहेबांच्या बिऱ्हाडीं गेल्याबरोबर त्यांना व त्यांच्या कुटुंबांना माहिती विचारली. ते म्हणाले कीं, प्रवास फार भयंकर आहे. सर्वत्र किर्र अरण्य आहे. एकटयादुकटयाची तर जाण्याची सोयच नाहीं. रात्रीस जाण्याची तर बंदीच आहे. चोर व दरोडेखोर यांची भीति आहे. हवा अतिशय थंड आहे. पांघरूण भरपूर पाहिजे. मार्ग अवघड आहे. तुम्ही सर्व मंडळी कसे तरी श्रीगुरु दत्तात्रेयांचे टेकडीच्या पायथ्यापर्यंत जाल; पण गुरुदत्त टेकडी तुम्हास ( म्हणजे मला ) डोळे झांकून इकडे तिकडे न पाहतां खरडत खरडत किंवा रांगत

रांगत किंवा पायऱ्यांवर हात टेकीत टेकीत चढलें पाहिजे. वर तर फारच आकुंचित जागा आहे. उभे राहण्याची सोय नाहीं. प्रदक्षिणा जेमतेम बसून घातल्यास घालतां येतील. वारा सुटल्यास वर उभें राहण्याची मुळींच सोय नाहीं. तेथें पाव अर्धा तासापेक्षां जास्त बसूं देत नाहींत. एकंदरींत प्रवास दगदगीचा, व धोक्याचा आहे.

या वर्णनानें आमच्या पूर्वग्रहासच बळकटी येऊन मी सुद्धां डगमगलों. माझें मन कचरूं लागलें. पण मी पुन्हा मनांत असा विचार करीं कीं, एवढीशी आमची मुलगी व आमची सूनबाई, ह्या सुद्धां चिमुकल्या मीनाक्षीला कडेवर घेऊन पायीं वर चढल्या, व खालीं आल्या. शेंकडों यात्रेकरूंचे संघ नित्यशः त्या पुण्यस्थानीं जाऊन दर्शन घेऊन येत आहेत. मग खरोखरच अडचणींची, धोक्याची, भयंकर व कठीण जर ही यात्रा असेल, तर त्या ठिकाणीं जाण्यास बाबा आम्हाला प्रेरणा करतील का ? प्रेरणा करून येथपर्यंत आणतील का ? येथपर्यंत आणून दर्शनावांचून परत पाठवितील का ? परत पाठवून आमची फजिती करतील का ? फजिती करून आमचा सुखाचा जीव दुःखांत घाल-तील का ? मी बाबांचें वारंवार स्मरण करून मनांत म्हणें कीं, बाबा, आपण आम्हां सर्वांच्या जवळ असून अम्हांला अशी भीति कां वाटते ? आपण आमच्या मनाचा निश्चय पाहतां का ? पण आम्ही कोण निश्चय करणार ? ती तरी सत्ता आपलीच आहे. याप्रमाणें कांहीं शुभाशुभ विचारांच्या लाटा कांहीं काळ-पर्यंत माझ्या मनोजलनिधीवर उसळूं लागल्या. पुन्हा वाटे कीं, अरे, बाबांच्या-वर श्रद्धा आहे ना ? मग आपण कां भ्यावें ? असें वाटून मी सर्वांना धीर देईं व बाबांवर पूर्ण विश्वास ठेवा व चला असें सांगें. कठीण प्रसंगाला वेदांत लट-पटतो. वैरी न चिंती तें मन चिंतीत असतें. तद्वत् माझी स्थिति झाली. पण पुन्हा श्रीज्ञानेश्वरींतील अ. ६ मध्यें हठयोग करण्याकरितां मूळबंध किंवा वज्रासन घातल्यावर श्रीजगदंबा कुंडलिनी उठी पोटांत नाना प्रकारें व्याधि उत्पन्न करून साधकाला भेडसाविते. पण साधकानें भिऊं नये, असें ज्ञानेश्वर-महाराज ज्या ओंवींत सांगतात " नाडीतें सोडवी । गांत्रातें बिघडवी । साध-

कातें भेडसावी। परी बिहावें ना ॥ २१९" ती ओवी वारंवार मला आठवे व भगवान् श्रीज्ञानेश्वरांच्या भाषेंत बाबाच मला भिऊं नको असें सांगत आहेत असें वाटे.

आण्णासाहेबांनीं सांगितलेली माहिती ऐकून तर माझ्या कुटुंबाच्या छातींत धडकीच भरली! त्या म्हणूं लागल्या कीं, आपण येथूनच परत जाऊं. माझ्या ज्येष्ठ भगिनी म्हणूं लागल्या कीं, आपण पायऱ्यांपर्यंत जाऊन तेथून दर्शन घेऊन परत येऊं. डॉक्टर ढवळ्यांची मंडळी कांहींच बोलली नाहींत. नंतर रात्रीचें जेवणखाण करून आम्ही सर्व निजलों; पण माझ्या कुटुंबाला झोंपच लागेना. त्या मध्येंच जाग्या होत व वर जावयाचेंच का म्हणून विचारीत. मी होय म्हणून सांगें. पहाटे पांच वाजतां गिरनारच्या पायथ्याजवळ जाण्याकरितां दोन टांगे आमच्या बिऱ्हाडीं यावयाचे होते. माझ्या कुटुंबाचें सर्व लक्ष तेथें टकटक (किंवा कटकट) करीत असलेल्या घड्याळाकडे लागलें होतें. घड्याळांत तिहींचा ठोका पडला. माझें कुटुंब उठलें, व जाण्याचें ठरलेंच का असें त्यांनीं मला भीतीच्या सुरांत विचारलें. मीं म्हटलें 'होय.' तर मग ३ वाजले, आतां उठावें असें त्या म्हणाल्या. मी चार वाजतां उठलों. इतर सर्व मंडळीही उठली. शौचमुखमार्जन होऊन स्नान झालें, चहापाणी झालें. आम्ही सर्व गिर्यारोहणाच्या तयारीच्या वेषांत सज्ज झालों!

सहाचा ठोका घड्याळांत पडला. अश्वरथाच्या घोड्याच्या टापा व घंटांचे मंजुळ (पण त्या वेळीं दुःखद) ध्वनि ऐकूं आले व टांगेवाल्यांनीं आपण आल्याची ललकारी मारली.

माझ्या कुटुंबानें पुन्हा विचारलें कीं, टांग्यांत बसावयाचेंच का? मीं म्हटलें 'होय.' टांगे जाऊन-येऊन प्रत्येकीं रुपये दोनप्रमाणें ठरविले होते. श्रीसद्गुरुस्मरण करून आम्ही सर्व टांग्यांत बसलों. तेथून पायथा २–३ मैल होता. आम्ही पायथ्याजवळ गेलों. तों त्याच्या किंचित अलीकडे सडकेवर पुलाच्या भिंती असून खालून पाणी वाहत होतें व पुष्कळ यात्रे-

करून तेथें स्नानसंध्या, जप वगैरे करीत बसलेले दृष्टीला पडले. आम्हाला त्या स्थलाबद्दल मुळींच माहिती नसल्यामुळें आम्हीं तें स्थान काय आहे, याबद्दल बिलकुल चौकशी केली नाहीं. आमचे टांगे जेथें थांबले, तेथें एक विस्तीर्ण धर्मशाळा व पुढें एक भव्य अंबारीसह हत्ती जाईल, एवढा मोठा दरवाजा दिसला. चौकशी करितां ह्याच दरवाजाच्या आंत तुमच्या पांच डोल्या तयार आहेत व याच दरवाजांतून वर चढावयाचें असें टांगे-वाल्यांनीं आम्हाला सांगितलें.

आम्हीं दरवाजांत जातांच आम्हाला तेथें माणसें वजन करण्याचा एक मोठा कांटा व वजनें दिसलीं. चौकशी करतां १२० पौंडांच्या आंत वजन असलेल्या माणसास दोन माणसांची डोली व १२० पौंडांपेक्षां जास्त पण १८० पौंडांच्या आंत वजन असलेल्या माणसाच्या चार माणसांची डोली, असें डोलीच्या माणसांचें प्रमाण आहे व दोन माणसांच्या डोलीला ६-१०-० व चार माणसांच्या डोलीला १०-२-० असे दर आहेत. तसेंच मुलें घेण्यास किंवा सामानाचें ओझें घेण्यास प्रत्येक मजुराला-मग तो पुरुष असो अगर स्त्री असो-, २-७-० चा दर आहे असें कळलें.

माणसांचें तेथें प्रत्यक्ष वजन करीत नाहींत. डोलकऱ्यांच्या डोळ्यांत वजन बसलेलें असतें. मनुष्याला पाहिल्याबरोबर किती माणसांची डोली पाहिजे, तें ते चटकन सांगतात. तक्रार असल्यास प्रत्यक्ष वजन करतात.

हे डोलीच्या माणसांचे ठराव व मजुरीचे दर जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांनीं लोकांच्या सोईसाठीं ठरवूनच ठेविले आहेत. त्यामुळें यात्रेकरूंना त्रास पडत नाहीं.

असो. आमच्या मंडळींत मी व डॉक्टर ढवळे यांचें कुटुंब या दोघांनाच चार चार माणसांच्या दोन डोल्या लागल्या. डॉक्टरसाहेब पायींच चालले. बाकीच्या चार माणसांना प्रत्येकीं एक, याप्रमाणें दोन दोन माणसांच्या चार डोल्या लागल्या. दोन मुलांकरितां दोन व सामानसुमानाकरितां एक,

याप्रमाणें आम्हीं तीन स्त्री-मजूर केले. हे सर्व स्त्री-पुरुषांसह १९ मजूर फार सुस्वभावी होते. त्यांनीं आम्हांला फुलाप्रमाणें संभाळून नेलें व परत आणिलें

याप्रमाणें आम्ही बालगोपालांसह नऊ माणसें व स्त्री-पुरुष मजुरांसह १९ माणसें म्हणजे एकंदर एक पादचारी, दोन पाठीवर झोळींत बसणारीं व सहा डोल्यांत बसलेलीं २८ माणसें वर जाण्यास सिद्ध झालों.

जंगल अति हृद्य पण पानें शुष्क होऊन खडत चाललेलीं, हिंस्र पशूंची व चोरांची भीति, अतिशय थंडी वगैरे माहिती आगाऊ कळल्यामुळें आम्हास प्रथमपर्यंत बरीच धास्ती वाटत होती. परंतु आमची सर्व तरतूद उपरिनिर्दिष्ट त्रैमूर्तींनींच करून दिली असल्यामुळें, आम्ही बाबांच्या नामाचा सारखा जप करीत असल्यामुळें, आपलें संरक्षण करण्याकरितां जुगराण आपल्याबरोबर आहेत ही पवित्र भावना पूर्ण जागृत असल्यामुळें व आम्ही गुरुमाउलीच्याच दर्शनाला जात आहों ही पुरी जाणीव असल्यामुळें आमच्या प्रवासाला एक प्रकारचें निराळेंच स्वरूप येऊं लागलें.

आम्ही सकाळीं ७।- वाजतां श्रीसद्गुरुरायांच्या नामाचा जयघोष करून पर्वतारोहणास सुरवात केली. सर्वांच्या पुढें मजूर, त्यांच्यामागें डॉक्टर-साहेब व त्यांच्यामागें डोल्या. सर्वांच्या मागें माझी डोली. आजूबाजूच्या घोर कुंजवनाचा, गिरिराजांच्या कृष्ण प्रस्तरशृंगांचा, त्या उंच, नीच, मखल, सपाट मार्गाचा अपूर्व व रम्य देखावा पाहून आमच्या सर्वांच्या अंतःकरण-मंदिरांतून भीति हडळीनें आपल्या चंबूगबाळ्यासह पलायन करून तें स्थान थोडक्याच अवधींत प्रसन्नतादेवीनें विभूषित केलें. आम्हांस उल्हास वाटूं लागला. उद्विग्नता मावळली; डोल्यांच्या दोऱ्या दोन्ही हातांनीं धरून खालीं पाय सोडल्याशिवाय आसनमांडी घालावी लागत असल्यामुळें हातपाय खुडून आल्यासारखे वाटण्याच्याऐवजीं डोल्या सुखासनें वाटूं लागलीं.

महादरवाजांतून निघतांच प्रथम प्रथम चढणीच्या कांहीं भागांत चुना दगडानें बांधलेल्या पक्क्या रुंद व लांब पायऱ्या व कांहीं भागांत नुसतीच

फरशी असल्यामुळें पायऱ्या फार उंच नसल्यामुळें व हिसके बसत नसल्यामुळें प्रत्येकाच्या अंतःकरणांत एक प्रकारचें नवचैतन्य उत्पन्न होऊन सर्वांना हुषारीच वाटूं लागली.

डोलकऱ्यांच्या डोक्याच्या पागोटेवजा पटका, अंगांत कोट, गळ्यांत खाण्याची व सामानाची पिशवी, नेसावयास तुमान, पायांत तिकडच्या चार्लीचे जोडे व एक हातांत काठी. शें-दोनशें चढणीच्या पायऱ्या गेल्या, कीं सर्व डोलकर मार्गांतच काठीवर डोली ठेवून क्षणभर उभे राहून विश्रांती घेत व नंतर काठी आपटीत आपटीत मार्गक्रमणास सुरवात करीत. मजुरांच्या हातांतही काठी असेच.

पायथ्यापासून शिखरापर्यंत सर्वच पायऱ्या घडीव दगडाच्या असून चुना व सिमिट यांत बांधलेल्या आहेत.

पायऱ्यांची उंची पायथ्यापासून शिखरापर्यंत प्रत्येकीं ६ इंचांपेक्षां जास्त नाहीं.

प्रथमच्या कांहीं पायऱ्या १०–१२ फूट लांबीच्या व फूट-सवा फूट रुंदीच्या आहेत.

नंतर शैलधिराजाच्या वरवर जसें जसें चढत जावें, तसें तसें जास्त जंगल व पायऱ्या ८–७–६ फूट लांबीच्या व फूट, दहा इंच रुंदीच्या अशा बांधल्या आहेत.

शेवटच्या श्रीगुरुदत्तात्रेय टेकडीच्या पायऱ्या मात्र चार फूट लांबीच्या व ८–९ इंच रुंदीच्या आहेत. म्हणजे दोन माणसें जोडीनें वर जातील, किंवा वरून खालीं येतील, किंवा एक माणूस खालून वर जाईल व एक मनुष्य वरून खालीं येईल.

ज्या ठिकाणीं पायऱ्यांच्या आजूबाजूस बरीच सपाटी आहे, तेथें पायऱ्यांच्या बाजूला भिंती बांधलेल्या नाहींत व तेथें भीतिही वाटत नाहीं. पण जेथें एका बाजूला काळाकभिन्न कडा व दुसऱ्या बाजूला खोलच खोल जागा

आहे, तेथें मात्र दीड, दोन किंवा तीन फूट उंचीच्या भिंती घातलेल्या आहेत.. यामुळें खालीं पडण्याची किंवा डोळे फिरून घेरी येण्याची (Land sickness) मुळींच भीति वाटत नाहीं.

खालून जात असतां वर रस्त्याकडे पाहिलें, म्हणजे एक मजेदार व भयंकर देखावा दिसतो. दुसऱ्या बाजूला ज्या दीड, दोन किंवा तीन फूट उंचीच्य भिंती घातलेल्या आहेत, त्यांवर सीमेंटाची गोल मुंढेरी केलेली आहे. त्यामुळें खालून पाहणाराला असें वाटतें कीं, काळ्याकुट्ट कड्याला एक पांढरी लांबच लांब रेघच मारलेली आहे, किंवा ही दुसऱ्या बाजूची भिंत कड्याला इतकी चिकटलेली आहे कीं, तेथून पुढें जाण्यास मार्ग तरी आहे, कीं नाहीं असें वाटून पोटांत धस्स होई. पण त्या ठिकाणीं गेल्यावर तेथें मार्ग आहे असें दिसून येई.

वर वर श्रीगुरुदत्तात्रेयांच्या टेकडीजवळ तीन चार ठिकाणीं कड्याचें पोट रस्त्यावर इतकें पुढें आलेलें आहे कीं, तेथून डोलीवाल्यांस डोली नेण्यास व वळणावर फिरविण्यास जरा त्रास पडतो, व "जरा संबालके बइठो" असा डोलीवाले डोलींत बसलेल्या मनुष्यास इषारा देतात.

वाटेंत पायथ्यापासून थेट शेवटच्या टेकडीपर्यंत, ठिकठिकाणीं थकलेल्या पादचारी यात्रेकरूंकरितां रमणीय आरामस्थानें, सुंदर विश्रांतिगृहें, पाणी पिण्याकरितां रुचिर जलाशयें व जलपानागारें, जेवणखाणासाठीं किंवा फराळ करण्यासाठीं लहानशींच पण सुरेख उपहारमंदिरें, स्नानासाठीं सुरम्य तीर्थालयें व दर्शनाकरितां प्रेक्षणीय देवालयें आहेत. साधुसंत, बैरागी, स्त्री-पुरुष, मुलें, वृद्ध-तरुण, श्रीमान-गरीब यात्रेकरूंचे वृंद ठिकठिकाणीं शिबिकेंत ( डोल्यांत) व पादचारी जातांयेतांना भेटतात, त्यामुळें निबिडारण्यांतील मार्ग आहे, तरी तो कंटाळवाणा किंवा एकलकोंडेपणाचा वाटत नाहीं. उलट चित्ताकर्षकच वाटतो.

पायथ्यापासून सुमारें ३००० फूट उंचीवर जैनांची टेकडी लागते. तेथें सुमारें १००—१२५ जैन मंदिरें आहेत. तीं सर्व टेकडीभर थोडथोड्या

अंतरावर चक्राकार रंगभूमींतील प्रेक्षकांच्या बसण्याच्या एकावर एक चढत्या रुचिरासनाप्रमाणें सुंदर संगमरवरी दगडांचीं बांधलेलीं असून प्रत्येक मंदीर भव्य व शृंगसुशोभित आहे. कित्येक फारच विस्तीर्ण असून विविध रंगांच्या दगडांनीं व वेलबुट्टयांनीं व इतर नाना तऱ्हेच्या सुबक वस्तूंनीं शृंगारलेला आहेत. मंदिरांत विहिरी आहेत. पूजारी आहेत व मंदीरसंरक्षक खाकी वेषीं-धारी पोलिस आहेत. ह्या स्थलांचा देखावा फार प्रेक्षणीय आहे.

येथें मोठमोठया धर्मशाळा आहेत. किराणा व इतर मालाचीं दुकानें आहेत. त्यांत दूध, तूप, दहीं, नारळ, उदबत्ती, केळीं, चहा, पेढे, साखर, खडीसाखर, धान्य मिळतें. मंदिरांत बसण्यास व आराम करण्यास थोडा वेळ जागा मिळते. पिण्यास विहिरीचें पाणी मिळतें.

येथें झाडी फार व हवा थंड आहे. सपाटी थोडी आहे. ह्या जैन टेक-डीस उपरकोट म्हणतात. पूर्वी येथें किल्ला होता. येथें सती राणकदेवीचें मंदीर आहे. आमच्या डोलकरांनीं येथें जरा विश्रांति घेतली व येथून आम्ही लागलीच पुढें चालूं लागलों.

तथून आम्ही श्रीअंबाजीचे ( जगज्जननी पार्वतीमाता ) टेकडीवर गेलों. जैन टेकडीपासून सुमारें १००० फूट उंचीवर ही टेकडी आहे.

जैन टेकडी व अंबाजी टेकडी यांच्यामध्यें श्री गोमती तीर्थ आहे. हें तीर्थ म्हणजे एक लहानसें चौकोनी आकाराचें घडींव दगडांनीं बांधलेलें उथळ, पण पाण्यानें भरलेलें कुंड आहे. येथें लहान लहान अशा शंकराच्या तीन पिंडी आहेत. ह्या तीर्थास गोमुखी गंगा असें म्हणतात.

अंबाजीचें मंदीर फार विस्तीर्ण, भव्य व सुबक आहे. या टेकडीवर थोडासा सपाट भाग असून येथें थोडीशी वस्ती पण आहे. हें मंदीर फार पुरातन असून काळ्या दगडाचें आहे. हेंही शिखर विमंडित आहे. यांत पुजारी लोक असतात.

अंबाजी १००–२०० फुटांवर श्री गोरखनाथांची टेकडी आहे. येथें एका दगडी चबुतऱ्यावर एक फारच लहान अजमासें तीन फूट लांबी-रुंदीचें व ३–४ फूट उंचीचें श्रीगोरखनाथांचें मंदीर आहे.

ह्याप्रमाणें येथवर एकंदर लहानमोठ्या चार टेकडया आहेत. जैन टेकडी, गोमुखी गंगा टेकडी, अंबाजी टेकडी व गोरखनाथ टेकडी. जैन टेकडीपासून गोमुखी गंगा टेकडी अजमासें ७००–८०० फूट उंच येईल. तेथून अंबाजी टेकडी अजमासें २००-३०० फूट उंच येईल, व तेथून गोरखनाथ टेकडी सुमारें १००–२०० फूट उंचीवर येईल.

आतां येथून उतार लागतो. कारण श्री गुरुदत्तात्रयांचा कडा या टेकडयां-पासून अगदीं अलग आहे. त्या टेकडयांवर जाण्यास या टेकडयांवरून परभारें दुसरा मार्ग नाहीं. म्हणून येथून सुमारें २००० फूट खालीं उतरावें लागतें व नंतर श्रीगुरुदत्त टेकडी चढावी लागते. खालीं उतरण्यास वरप्रमाणेंच घडींव दगडांच्या बांधीव पायऱ्या आहेत. पण वरून एकदम खालीं यावयाचें हाही एक अजबच देखावा दिसतो.

उतार संपल्यावर श्रीगुरुदत्तांची टेकडी चढण्यास सुरवात होते. ही चढण अगदीं उरावर येते. या चढणीस डोलकर अगदीं टेकीस येतात, व जवळ जवळ उभे राहून लवकर लवकर विश्रांति घेतात. चार माणसांच्या व दोन माणसांच्या डोल्यांचे डोलकर जरूर वाटल्यास आप-आपसांत फेरबदलही करितात.

प्रथमपासून सुमारें एक हजार पायऱ्या चढेपर्यंत आजूबाजूला माती व त्यावर जंगलीं झाडें दिसतात, व पुढें तीन कडे लागतात. ते निवळ काळ्या कठीण फत्तराचे आहेत. हे तीन कडे म्हणजे तीन उंच एक-जीवाचे दगड आहेत.

जैन टेकडीपर्यंत पायऱ्या अजमासें ६०००, नंतर अंबाजीपर्यंत २०००, नंतर गोरखनाथपर्यंत ४००, येथून उतार पायऱ्या अजमासें ३००० व तेथून श्रीगुरुदत्त टेकडी पायऱ्या अजमासें ४६०० मिळून

एकंदर १०००० पायऱ्या आहेत व एकंदर श्रीगुरुदत्त टेकडीपर्यंत उंची अजमासें ५०० फूट आहे.

डोल्या वरपर्यंत जातात. शेवटच्या ५०-७५ पायऱ्या वर जात नाहींत. कारण सुळक्यावर डोली वळविण्यास व ठेवण्यास जागा मुळींच नाहीं. वर जागा फक्त चौकोनी चक्राकार वाटोळी १७-१८ फूट परिघाची किंवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सरासरी १० फूट लांब व १० फूट रुंद एवढ्या खोलीइतकी जागा आहे. सर्व जागेभोंवतीं दोन फूट उंचीची पक्की दगडाची भिंत आहे. त्या जागेच्या मध्यभागीं पांच फूट लांब व पांच फूट रुंद व २ किंवा ३ इंच उंच असा एक दगडी चबुतरा आहे. त्यावर तीन फूट लांब व तीन फूट रुंद व तीनचार फूट उंचीचें देव्हाऱ्यासारखें देवाचें दगडी मंदीर आहे. त्यांत फक्त श्रीगुरुदत्तात्रेयांची ९-१० इंच लांब व ३-३॥ इंच रुंदीचीं पिंवळसर दगडाचीं दोन पावलें खालील दगडी जमिनीसरशींच आहेत.

तेथें दोन गिरनारी ब्राह्मण बसलेले असतात. तेथें मंदिराच्या एका अंगास एक लहानसा औदुंबर वृक्ष आहे, व त्याच्यासमोर दुसऱ्या बाजूकडे मंदिरापासून जरा दूर, दोन फूट उंचीच्या ओटयावर अजमासें २-२॥ फूट उंचीवर एक लहानशी घंटा टांगलेली आहे. मंदिराभोंवतीं प्रदक्षिणा करतां येते. आम्हीं सर्वांनीं तीन तीन प्रदक्षिणा घातल्या. वर सर्व मोकळें व उघडें आहे. थुंकण्यास, लघुशंका करण्यास व राहण्यास जागा नाहीं, व इतक्या उंचीवर व इतक्या अकुंचित् जागेवर वर वर्णिलेल्या मंदिरापेक्षां जास्त लांबी-रुंदी व उंचीचें मंदीर किंवा दुसरी एखादी इमारत किंवा छपर होणें शक्य नाहीं. त्यामुळें तेथें अर्ध्या तासापेक्षां जास्त थांबतां येत नाहीं. वर पाणी नाहीं. कितीही ऊन असलें, किंवा पाऊस असला, तरी वाऱ्याच्या सोसाटयामुळें छत्री उघडून बसणें किंवा उभें राहणें शक्य नाहीं. आम्ही सर्वांनीं त्या दिव्य, पवित्र व पूज्य श्रीसाईदत्तगुरु चरणावर परम आदरानें, प्रेमानें व भक्तियुक्त अंतःकरणानें लोटां-

गण घालून त्यांचें पुण्य व गोड दर्शन घेतलें, व विनयपूर्वक दक्षिणा अर्पण करून अर्ध घटका तेथें बसलों. अत्यानंद वाटला. बावांच्या लीलेचें कौतुक वाटलें. भीतीचें पर्यवसान सुखानंदाश्चर्यांत झालें. आनंदीआनंद झाला. बावांवर श्रद्धा न ठेवितां भीतीनें गांगरून व घाबरून जाऊन जर या ठिकाणीं येण्याचें टाळलें असतें, तर या स्वर्गीय सुखास व आनंदास अंतरलों असतों असें सर्वांस वाटूं लागलें.

नंतर आम्ही खालीं डोल्या होत्या तेथें आलों, व डोल्यांत न बसतां कांहीं पायऱ्या मजेखातर उतरलों व नंतर डोल्यांत बसलों.

आम्हीं पायथ्यापासून बरोबर सव्वासात वाजतां निघालों, व प्रभुचरणांजवळ बरोबर सव्वाअकरा वाजतां गेलों. नंतर तेथून अजमासें १२ च्या सुमारास परत फिरलों, तों जैन टेकडीवर सुमारें दीड वाजतां आलों. तेथें आम्हीं श्री सेवादास यांच्या जैन मंदिरांत बसून फराळ करून थोडा वेळ आराम घेतला. डोलीवाल्यांनींही तेथे उपहार केला व आराम घेतला. सुमारें ३ वाजतां तेथून निघून साडेचार वाजतां पायथ्याच्या दरवाजाजवळ आलों. अर्ध्या तासानें आमचे टांगे आले व त्यांत बसून आम्ही जुनागड शहरांत श्री. जोशीसाहेबांच्या बिऱ्हाडीं गेलों. त्यांना व श्री. अण्णासाहेब माणके यांना आमचा गिर्यारोहणावरोहण मधुर वृत्तांत सांगितला. त्यांनाही आनंद झाला. त्या नगाधिराज शिखरावर जातांना आम्हास ऊनही लागलें नाहीं, थंडीही लागली नाहीं व वरतर वातलहरींची झुळुक सुद्धा भेटली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही अग्निरथांत बसून राजकोटला आलों.

राजकोट हें जंक्शन स्टेशन आहे. येथूनच गिरनारला जाण्याकरितां राजकोट टाउन स्टेशनवर बसून जुनागडला जावयाचें व श्री सोरटी सोमनाथला जाण्याकरितां वेरावळ स्टेशनला जावयाचें. राजकोटाहून जुनागडचें भाडें १-३-० व जुनागडपासून वेरावळचें भाडें ०-१५-० पडतें. श्रीद्वारकाधीश कृष्ण परमात्म्याच्या नगरीस जाण्याकरितांही राजकोटासच यावें

लागतें. येथून राजकोट जामनगर गाडीनें जाऊन तेथें गाडी बदलून नंतर जामनगर द्वारका गाडीनें पुढें जावें लागतें. राजकोटपासून जामनगरचें भाडें ०-१५-० पडतें, व जामनगरपासून द्वारकापुरीचें भाडें २-१४-० ( स्टेशनपासून गांवांत नेऊन सोडण्याच्या मोटरी सुद्धा ) पडतें.

येथें प्रामुख्यानें एक गोष्ट नमूद करून ठेवण्यास अत्यानंद वाटतो कीं, या पायऱ्या अलीकडे ५-७ वर्षांतच जुनागड संस्थानचे दिवाण रा. ब. तांबे यांनीं संस्थानच्या दीड-दोन लाख रुपये खर्चानें बांधून घेतल्या व यात्रेकरूंवर व पुराणवस्तुसंशोधकांवर तसेंच निसर्गाची शोभा, सौंदर्य व लीला पाहण्यास जाणाऱ्यांवर अनंत उपकार करून ठेविले आहेत. त्यांचें श्री गिरीनारायण कल्याण करोत. या पायऱ्या बांधण्याच्या पूर्वीं मात्र माधवराव देशपांडे यांनीं सांगितल्याप्रमाणें रस्ता व विशेषें करून श्री दत्तात्रेय टेकडीचा रस्ता अति भयंकर व धोक्याचा होता.

आतां आपण ह्या गिरनार क्षेत्राच्या पुरातन व पौराणिक पण ऐतिहासिक भागाकडे वळूं. श्रद्धाळु व पुराणवस्तुसंशोधकांनाही या भागांत एक प्रकारची मजा वाटेल व त्यांना बरींचशीं अनुमानें काढतां येतील.

## तोटक छंद

गुरुदेवपरम् । गुरुदत्तपरम् । गुरुसत्यपरम् । गुरुब्रह्मपरम् ॥
गुरुज्ञानपरम् । गुरुसाईपरम् । गुरुनाथपरम् । गुरुराजपरम् ॥

पूर्वीं कलियुगांत चंद्रकेतु नांवाचा राजा राज्य करीत होता. तो महापुण्यवान, पवित्र व पराक्रमी होता. तो सूर्यवंशी असून श्रीविष्णु व शंकर यांचा महाभक्त होता. तो दररोज वैकुंठ व कैलास येथें विष्णूच्या व शिवाच्या दर्शनास जात असे. वृद्धापकाळामुळें त्याला वैकुंठास व कैलासास जाण्यास अतिशय कष्ट होऊं लागले, तेव्हां शंकर व मी तेथें नित्य वास करतों. अशा दैवताचलाजवळ एक नगरी बांधून तेथें तूं राहा अशी आज्ञा केली. त्याप्रमाणें चंद्रकेतु राजानें तेथें सुंदर नगरी बांधून तीस जीर्णदुर्ग असें नांव

दिलें. यालाच आतां जुनागड असें म्हणतात. या नगरींत नवदुर्गा, मातृका, नंदा, पूर्णा, रक्तदंता, शामा, भद्रा, जया, कात्यायिनी, मातृका व सिद्धा अशा नऊ देवता आहेत, व त्यांच्याचजवळ त्रिवेणी नांवाचें एक तीर्थ आहे.

## पर्वत किंवा धराधर

परमात्म्यानें प्रथम (ब्रह्मदेवाच्या दिनोदयीं म्हणजे कल्पप्रारंभीं) विश्व निर्माण केलें. त्यांत अनंत वस्तूंबरोबर पर्वतही निर्माण केले. त्यांत हिमाचल, विंध्याचल, ककुभ, नील, गंधमादन, मेरू, त्रिशंख, शंख, सुपार्श्व कुमुद, केसर, सह्याचल, कैलास, करवीर, श्रीशैल, ऋष्यमूक व गिरनार हे मुख्य आहेत. ह्यांना पूर्वीं पंख असत.

## पर्वत उत्पन्न करण्याचा हेतु

हे पर्वत निर्माण करण्याचा हेतु असा होता कीं, त्यांनीं पृथ्वीला धारण करून तिचें संरक्षण करावें. आणि म्हणून त्यांना धराधर अशी संज्ञा आहे.

## पंखयुक्त म्हणजेच ज्वालामुखी

ह्या पर्वतांना पंख असल्यामुळें हे वाटेल तिकडे उडत व पृथ्वीचें संरक्षण करण्याऐवजीं तिचा नाश मात्र करीत. (माझ्या मतें पूर्वीं हे सर्व पर्वत पंखयुक्त म्हणजे ज्वालामुखी होते. ते वाटेल तेव्हां व वाटेल तिकडे लाव्हा, धूर व राख, फोपाटा, प्राणी, दगड, पाणी, वायु, रेती, चिखल आपल्या मुखांतून फेकून देऊन चराचर सृष्टीचा उच्छेद करीत.) पृथ्वी-वरील व समुद्राच्या पोटांतील (म्हणजे वडवानल) ज्वालामुखींत २ प्रकार आहेत. ज्ञानकोश भाग १४, पृ. ३९, पृ. ४१०.

## पर्वतांचें पंखछेदन, स्थिरीकरण व गूढीकरण

ब्रह्मदेवानें, हें अरिष्ट पाहून, आपल्या वज्रानें ह्यांचे पंख तोडून टाक अशी इंद्राला आज्ञा केली. त्याप्रमाणें इंद्रानें पुष्कळ पर्वतांचे पंख तोडले.

( म्हणजे पुष्कळ पर्वतांवर जोराची पर्जन्यवृष्टि होऊं लागल्यामुळें त्यांच्यांतील ज्वलनक्रिया थांबली. ) आतांपासून आम्ही उडणार नाहीं, एके ठिकाणीं स्थिर राहूं, अशी मेरुमंदराचल व कैलास या पर्वतांनीं कबुली देऊन इंद्राकडून अभयवचन घेतलें व कांहीं इंद्रभयानें समुद्रांत जाऊन पंखांसह दडून बसले. ( जाव्हा, जपान अल्युशिअन बेटें, व एटिल्स वगैरे ठिकाणीं समुद्राच्या आश्रयाला ) म्हणजे नेपल्सचा उपसागर, भूमध्य समुद्र सुद्धां सामुद्रधुनी यांत आहेत.

## गिरनार समुद्रांत गुप्त

समुद्रांत दडून बसणारांत हिमालयाचा ज्येष्ठ पुत्र गिरनार हा होता. गिरनार हा देवी पार्वतीचा भाऊ व श्रीशंकराचा शालक. समुद्रांत शिरून त्याचे आपण पंख तोडले, तर पार्वतीमातेचा व शंकराचा आपल्यावर कोप होईल म्हणून इंद्रदेवानें त्याचे पंख न तोडतां ही हकीकत ब्रह्मदेवाला सांगितली. ब्रह्मदेव व इंद्र विष्णूकडे गेले. आपला बंधु गिरनार यावर अनर्थ कोसळून त्याला समुद्रांत दडून बसण्याची पाळी आली, म्हणून पार्वतीमाता फारच संतापल्या, व आतांच्या आतां माझ्या भावाचा पत्ता लावून द्या म्हणून त्यांनीं शंकरासह सर्व देवांना बजावलें. स र्व देवांसह विष्णु समुद्राकडे गेले.

## गिरनारचें प्रकटीकरण

तूं पांच योजनें दूर जा व गिरनारला पाण्याच्या पलीकडे करून दे अशी समुद्राची त्यांनीं प्रार्थना केली. समुद्रानें लागलीच त्याप्रमाणें केलें. खरोखरच हल्लीं गिरनारपासून पश्चिमसमुद्र पांच योजनें म्हणजे ४०–५० मैल दूर प्रवास म्हणजे सोरटी सोमनाथाजवळ दिसतो. गिरनारला पाहून पार्वतीअंबेला आनंद झाला व आतांपासून गिरनारचें संरक्षण करण्यासाठीं शंकरासह सर्व लहानमोठ्या देवांनीं गिरनारवर राहावें व मीही तेथेंच राहीन असें सांगितलें.